नि.दि.मु.क्र. १९४/२०१८
सतिश वि. सुभाष व इतर
नि. ५

## :: **आ दे श** ::

१. अर्ज वाचला, नि. २६ वरील प्रतिवादींचा जबाब वाचला. वादीं तर्फे ॲड. पी. व्ही. हेरकळ व प्रतिवादी तर्फे ॲड. डी. पी. धुमाळ यांचा युक्तीवाद ऐकला.

२. मौजे ओझर्डे तालुका वाई येथील शेत जमिनी गट क्र. १६४/१, ३६२, ४०८, १६, ३५५ व १६५ तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र. ११६ व १५३१ या मिळकती बाबत निरंतर ताकीदी करीता, जाहीर ठरावा करीता व वाटपा करीता हा दावा वादीने दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकाला पर्यंत प्रतिवादींनी वाद मिळकतीमध्ये बांधकाम करु नये तसेच वाद मिळकत कोणालाही तबदील करु नये, म्हणुन त्यांचे विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, याकरीता वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम १ प्रमाणे हा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी नि. २६ वर त्यांचा जबाब दाखल करुन हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व प्रतिवादींचे जबाबावरुन, हा अर्ज निकाली काढणे कामी मी खालील मुद्दे निश्चित केले आहेत व त्यावर माझा निष्कर्ष देवुन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. | अनुकुलतेचा समतोल वादीचे हक्कात आहे काय ? | ... नाही. |
| ३. | अर्ज नामंजुर केला तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... नाही. |
| ४. | काय आदेश ? | ... अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

:: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता** :

५. मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता वादीने प्रथम दर्शनी केस त्यांचे हक्कात आहे काय, अनुकुलतेचा समतोल त्यांचे हक्कात आहे काय तसेच अर्ज नामंजुर केला तर त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे तीन घटक सिध्द करणे गरजेचे आहे. या शिवाय वादी स्वच्छ हेतुने न्यायालया समोर आलेला असणे गरजेचे आहे.

६. वादीचे कथना नुसार वाद मिळकती या त्याच्या व प्रतिवादींच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. वाद मिळकतीमध्ये सरस

निरस मानाने वाटप झालेले नाही, असे वादीचे कथन आहे. वाद मिळकत गट क्र. १६४/१ यामध्ये वादीस हिस्सा असतानाही त्याचा हिस्सा डावलुन प्रतिवादी क्र. २ शिवाजी याने सदरचे मिळकती बाबत पोकळ दस्त केला आहे. वाद मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा आहे व तो हिस्सा वादीला मिळु नये म्हणुन वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी बेकायदेशिरपणे बांधकाम करत आहे तसेच वाद मिळकत ति—हाईत इसमास तबदील करण्याच्या प्रयत्नात आहे त्यामुळे प्रतिवादीं विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, अशी विनंती वादीने केली आहे.

७. प्रतिवादींचे कथना नुसार वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वाद मिळकती बाबत पुर्वीच वाटप झालेले आहे व प्रत्येकजण स्वतःचे हिश्श्या प्रमाणे वहिवाट करत आहेत. प्रतिवादींचे कथना नुसार वाद मिळकत गट क्र. १६४/१ ही त्यांचे वडील हरीभाउ यांचे स्वकष्टार्जित मिळकत आहे व सन १९९८ साली हरीभाउने प्रतिवादी क्र. १ सुभाष यास गट क्र. १६४/१ खरेदी पत्राने दिले आहे. त्यामुळे गट क्र. १६४/१ मध्ये हिस्सा मागणेचा वादीला अधिकार नाही. अशा परिस्थितीत हा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

८. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकल्या नंतर मी दावा, लेखी कैफीयत व वाद मिळकतीचे कागदपत्रांचे अवलोकन केले आहे. वाद मिळकतीचे दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, अभिलेखावर वादी व प्रतिवादींची नावे सामाईकपणे

आहेत. वादीस वाद मिळकतीमध्ये हिस्सा आहे की नाही हा पुराव्याचा भाग आहे. त्याबाबत या क्षणी निष्कर्ष काढता येणार नाही. वाद मिळकतीचे दाखल कागदपत्रां वरुन वादी व प्रतिवादी यांची नावे सामाईकपणे असल्याचे दिसुन येत आहे त्यामुळे सह हिस्सेदारां विरुध्द मनाई हुकूम आदेश पारीत करणे उचित होणार नाही, असे माझे मत आहे.

९. वादीचे हक्कात प्रथम दर्शनी केस दिसुन येत नाही. अर्ज नामंजुर केला तर वादीचे कसल्याही प्रकारे नुकसान होण्याची शक्यता दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत अर्ज नामंजुर करणे उचित होईल. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u> :**

१०. मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत केल्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आ दे श ::**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

ठिकाण : वाई. (व्ही. एन. गिरवलकर)
दिनांक : १७.०९.२०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.